नवराष्ट्र

### जळगावात मोदींचे महिला सुरक्षेवर परखड भाष्य; कारवाईस दिरंगाई करणाऱ्यांविरोधातही कठोर कारवाई

# दोषी कोणीही असो, शिक्षा होणारच

जळगाव, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. 'महिलांवरील अत्याचार हे अक्षम्य पाप आहे. हे पाप करणारा कोणीही असो, तो सुटता कामा नये. त्याला कोणत्याही प्रकारे मदत करणाऱ्यांनाही सोडता कामा नये. सर्वांचा हिशेब व्हायला हवा,' असा स्पष्ट संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रविवारी जळगावात 'लखपती दीदीं'चा मेळावा पार पडला. या कार्यक्रमाला एक ते दीड लाख बचत गटाच्या महिला सहभागी झाल्या होत्या. यावेळी मोदी यांनी महाराष्ट्रातील स्त्रियांचा गौरव केला. तसेच महिला अत्याचारांच्या वाढत्या गुन्ह्यांबद्दलही भाष्य केले. तसेच त्यांनी महायुती सरकारच्या कामांचे कौतुकही यावेळी केले. यावेळी व्यासपीठावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गिरीश महाजन, मंत्री गुलाबराव पाटील उपस्थित होते.

आज मी देशातील प्रत्येक राजकीय पक्ष आणि राज्य सरकारने महिला सुरक्षेबाबत सजग राहिले पाहिजे. आरोपीला मदत करणारी रुग्णालये असोत, शाळा असोत, कार्यालये किंवा पोलिस.. कुठल्याही स्तरावर निष्काळजीपणा झाला तरी प्रत्येकाचा हिशेब करायला हवा. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना शिक्षा व्हावी यासाठी आमचे सरकार सातत्याने कायदे कडक करत आहे, असेही मोदी यांनी यावेळी सांगितले.



### सरकारे येतील–जातील...

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, सरकारे येतील–जातील, परंतु एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे रक्षण व्हायला हवे. महिलांच्या चारित्र्याचे रक्षण व्हायला हवे. आपण एक समाज म्हणून, एक सरकार म्हणून त्यांचे संरक्षण करायला हवे. तेच आपले मोठे कर्तव्य आहे.

### महाराष्ट्र चमकता तारा

भारत विकसित होत आहे. त्यात महाराष्ट्राची मोठी भूमिका आहे. महाराष्ट्र विकसित भारताचा चमकता तारा आहे. गुंतवणूकदारांच्या आकर्षणाचे केंद्र आहे. महाराष्ट्राचे भवितव्य सर्वाधिक गुंतवणुकीत आहे. महायुतीचे सरकार म्हणजे गुंतवणूक आणि नोकरीची गॅरंटी आहे. - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

### आरोपींना शिक्षा होण्यासाठी कडक कायदे केले

नव्या कायद्यात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक शोषणावर फाशी आणि जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केली आहे. लग्नाच्या नावाने मुलींची फसवणूक केली जायची, त्यावर शिक्षा होत नव्हती. आता यावर आम्ही कायदे केले आहे. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकार महिलांच्या सोबत आहे, राज्याच्या सोबत आहे. अत्याचार करणारी मानसिकता आपल्याला दूर करायची आहे, असेही मोदी म्हणाले.

### १० वर्षांत १ कोटी लखपती दीदी

मोदी म्हणाले, लोकसभा निवडणुकीच्या वेळी मी ३ कोटी बहिणींना लखपती दीदी बनविण्याचे वचन दिले होते. बचत गटांच्या माध्यमातून गेल्या १० वर्षांत १ कोटी महिला आणि अवघ्या दोन महिन्यांत आणखी ११ लाख महिला लखपती दीदी झाल्या. आज येथे लखपती दीदींचा मेळावा होतोय. देशभरातील लाखो महिला मंडळांसाठी ६ हजार कोटींहून अधिक निधी देण्यात आला आहे, असे मोदींनी सांगितले.

### पोलंडच्या राजधानीत कोल्हापूरचे स्मारक

आपल्या पोलंड भेटीची आठवण करून देताना मोदी म्हणाले, पोलंडचे लोक महाराष्ट्रातील लोकांचा खूप आदर करतात. त्यांच्या राजधानीत कोल्हापूरचे स्मारक आहे. पोलंडच्या लोकांनी हे स्मारक कोल्हापूरच्या लोकांच्या सेवेच्या भावनेचा आणि आदरातिथ्याचा गौरव करण्यासाठी बांधले आहे. दुसऱ्या महायुद्धात पोलंडच्या हजारो माता-बालकांना कोल्हापूरच्या राजघराण्याने आश्रय दिला होता.

दैनिक

नवराष्ट्र

## नार -पार योजनेला कॅबिनेटची मंजुरी, लवकरच निविदा : देवेंद्र फडणवीस

# महिला सक्षमीकरणाला साथ ! : शिंदे



जळगाव, (वा.) पंतप्रधान नरेंद्र मोदी देशात विविध योजना राबवून महीलांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांच्या या प्रयत्नात महाराष्ट्राचीही भक्कम साथ असेल असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

तर खानदेशासाठी महत्वाकांक्षी असलेल्या नार-पार योजनेच्या निविदा काढण्यासाठी मंत्री मंडळाच्या बैठकीत मंजूरी देण्यात आली असून लवकरच त्या निविदा काढण्यात येतील अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. जळगाव येथे आयोजित लखपती दीदी मेळाव्यात ते बोलत होते.

यावेळी बोलतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, कि जळगाव येथील लखपती दीदी मेळाव्यासाठी महीलांचा जनसागर उसळला आहे. या उपस्थितीने आजवरचे सभेचे संपूर्ण रेकॉर्ड मोडले आहे. जळगाव सोन्यासाठी प्रसिध्द आहे, तर लाडक्या बहिणी त्यापेक्षा सरस आहेत.

महिला सक्षमीकरणासाठी महाराष्ट्रही आग्रेसर आहे, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतर्गत एक कोटी महिलांच्या बँक खात्यात दोन हप्ते टाकण्यात आले आहेत. आणखी बहिणींच्या खात्यात ही रक्कम टाकण्यात येईल. माझ्या लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावर आनंद दिसला पाहिजे.महाराष्ट्रातही एक कोटी महीलांना लखपती दीदी करण्यात येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशात महीलाचे आर्थिक सशक्तीकरण करीत आहेत. त्यासाठी महाराष्ट्राचीही साथ असणार आहे.

### नार-पारसाठी निविदा

■ देवेंद्र फडणवीस म्हणाले, की लखपती दीदी संमेलनासाठी उपस्थित महिलांनी आजपर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडलेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महीलांसाठी विविध योजना राबविल्या आहेत. त्यात महाराष्ट्राचेही योगदान मोठे आहे. महाराष्ट्रात बचत गटासोबत ७५ लाख परिवार जोडले गेले आहेत.ती संख्या वाढवून दोन कोटीपर्यंत नेण्यात येणार आहे. महिला कर्ज घेतल्यानंतर त्याची व्यवस्थित फेड करीत असल्यामुळे बँका व पतसंस्था त्यांना कर्ज देण्यास तयार आहेत. तर नार-पार योजनेसाठी राज्यपालांनी मंजूरी दिली होती, तसेच निधीची तरतूदही करण्यात आली. आता कॅबीनेटच्या बैठकित योजनेच्या कामाच्या निविदा काढण्यास मंजूरी देण्यात आली असून लवकरच त्याच्या निविदा काढण्यात येतील. तसेच वाघूर योजनेसाठी २२७० कोटी, पाडळसरे योजनेसाठी २८९० कोटी रुपयाची तरतूद करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

■ राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन, कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान, केंद्रीय राज्यमंत्री प्रताप जाधव व रक्षा खडसे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, पालकमंत्री गुलाबराव पाटील, मंत्री अनील भाईदास पाटील, खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, मंगेश चव्हाण, लता सोनवणे, किशोर पाटील, संजय सावकारे आदी उपस्थित होते.

### लखपती दीदींसाठी महाराष्ट्राची साथः पवार



राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाले, की पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान झाले याबद्दल त्यांचे स्वागत करीत आहोत. त्यांच्या संकल्पनेतील लखपती दीदी कार्यक्रमासाठी आज लाखो भगिनी उपस्थीत आहेत. माझ्या जीवनात आपण प्रथमच एवढी महिलांची उपस्थिती पहात आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचा विकासाचा सुरू केलेला रथ आज आपल्या राज्यात आणि जळगाव जिल्ह्यात पोहोचला हे मोठे भाग्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महीलांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजनेतून महिला सक्षम होत आहेत. या सक्षमीकरणात महाराष्ट्राचेही योगदान असणार आहे. यावेळी केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनीही मनोगत व्यक्त केले.

### उघड्या जीपमधून भगिनींना अभिवादन



पंतप्रधान नरेंद्र मोदी विमानतळापासून संमेलन स्थळापर्यंत उघड्या जीपमधून आले होते. त्यांनी भगिनींना अभिवादन केले. या उघड्या जीपवर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार,केंद्रीय युवक कल्याण मंत्री श्रीमती रक्षा खडसे यांनी महिलांना अभिवादन केले. यावेळी महीलांचा मोठ्या प्रमाणात उत्साह दिसून आला.

### विमानतळावर भव्य स्वागत

1 पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे दुपारी जळगाव विमानतळावर आगमन झाले.त्यावेळी राज्याचे मदत व पुर्नवर्सन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनीही स्वागत केले. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी महाराष्ट्रासह विविध राज्यातून आलेल्या लखपती दीदीशी संवाद साधला यावेळी लखपतीदीदींनी त्यांची आरती करून औक्षण केले. आदीवासी नृत्याने त्यांचे स्वागत करण्यात आले.

### जिल्ह्याच्या भूमीची वारकरी पंरपरा : मोदी

2 पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात जळगाव जिल्ह्याच्या भूमीला वारकरी पंरपरा असल्याचे नमूद केले.ते म्हणाले कि या भूमीला वारकरी संप्रदायाची परंपरा आहे. संत मुक्ताईची ही भूमी आहे.त्यांच्या जीवनातून आम्हाला प्रेरणा मिळते. कवियित्री बहिणाबाई चौधरीची ही भूमी आहे. त्यांच्या कविता आम्हाला जीवन जगण्यास प्रेरणा देते.महाराष्ट्राची मातृशक्ती देशाला प्रेरणा देते माता जिजाऊनी छत्रपती शिवाजी महाराजांना शिक्षण दिले. सावित्रीबाई फुले यांनी महीलांना शिक्षणाचा पाया रोवला. आमचा देश विकसीत करण्यास मातृशक्तीचे मोठे योगदान आहे.

### दुर्घटनेतील मृतांना श्रध्दांजली

3 नेपाळमध्ये झालेल्या बस अपघातात जळगाव जिल्ह्यातील स्थानिक मरण पावले.पंतप्रधान मोदी यांनी आपल्या भाषणात मृतांना श्रध्दांजली अर्पण केली. तसेच जे स्थानिक रूग्णालयात उपचार घेत आहेत. त्यांची तब्येत लवकर सुधारण्यासाठी प्रार्थना केली. अपघातातील मृतांचे पार्थिव तातडीने जळगाव येथे वायुदलाच्या मदतीने आणण्यात आले. केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांना नेपाळ येथे पाठविण्यात आले होते. भारत सरकार नेपाल सरकारशी संपर्क साधून होते असेही त्यांनी सांगितले. जखमी व्यक्तींवर उपचार सुरू असून त्याकडेही लक्ष असल्याचे सांगितले.